# <u>प्रेसनोट</u>

<u>पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 386/2022 दिनांक : 07.10.2022</u>

## 1)घरफोडी :–

**मुखेड** :– दिनांक 29.09.2022 रोजी सायकांळी 07.00 ते दि. 06.10.2022 चे सकाळी 09.00 वा. चे दरम्यान, **गायकवाड गल्ली फिर्यादीच्या घरी ता. मुखेड जि. नांदेड येथे,** यातील अज्ञात आरोपीने घरातील कपाटात ठेवलेले सोन्या चांदीचे दागिने किंमती 14,500/–रूपयाचे कोणीतरी अज्ञात चोरटयांने चोरून नेले. वगैरे **फिर्यादी रेखा सुशिल गायकवाड, वय 25 वर्षे, व्यवसाय घरकाम व शिवणकाम रा. गायकवाड गल्ली ता. मुखेड जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुखेड** गुरन 301/2022 कलम 454, 457, 380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री पांडे, मो.क्रं. 88055957440** हे करीत आहेत.

## 2)कलम 380 चोरी :–

**वजिराबाद** :–दिनांक 04.10.2022 रोजी चे 08.35 वा. चे सुमारास, **यात्री निवास गुरूद्वारा रूम नं–16 नांदेड येथे,** यातील फिर्यादीची मुलगी मोबाईल पाहात बसली असताना कोणीतरी अज्ञात चोरटयाने रूम मधील टेबलावर ठेवलेली पर्स, पर्स मधील नगदी 25,000/–रू व एक डायमंड रिंग किंमती 1,30,000/–रूपयाचे, दोन सॅमसंग कंपनीचे मोबाईल 20,000/–रूपयाचे असा एकुण 1,75,000/–रूपयाचा ऐवज चोरून नेला. वगैरे **फिर्यादी मनप्रितकोर अमनसिंघ रेखी, वय 38 वर्षे, रा. एके–2 फतेनगर गेट नवी दिल्ली** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरनं 349/2022 कलम 380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/452 उतकर, मो.क्र. 9823101742** हे करीत आहेत.

## 3)चोरी :–

**1)उस्माननगर** :–दिनांक 04.10.2022 रोजी 03.00 वा. चे सुमारास, **मौ. हाळदा ता. कंधार जि. नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी सगंणमत करून मौ. हाळदा येथील इंडस कंपनीचे टावरमधील जिओ कॅबिनेट मधील राउटर किंमती अंदाजे 10,000/–रूपयाचे चोरून नेले. वगैरे **फिर्यादी मधुकर रमेश गायकवाड, वय 27 वर्षे, व्यवसाय खाजगी नौकरी रा. शिवरामनगर परभणी ता. जि. परभणी** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे उस्माननगर** गुरनं 169/2022 कलम 379, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/127 एम.वाय. मुंडे, मो.क्र. 9421390003** हे करीत आहेत.

**2)कुंटूर** :–दिनांक 04.10.2022 रोजी 02.05 ते 03.45 चे दरम्यान, **मौ. घुंगरावळा येथील इंडस टॉवर ता. नायगाव जि. नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी सगंणमत करून मौ. हाळदा येथील इंडस कंपनीचे टॉवरमधील जिओ कॅबिनेट मधील राउटर किंमती अंदाजे 25,000/–रूपयाचे व वोडाफोन डस 2001 ब बीटीएस कंपणीचे किंमती 5,000/–रूपयाचे असा एकुण 30,000/–रूपयाचे चोरून नेले. वगैरे **फिर्यादी मधुकर रमेश गायकवाड, वय 27 वर्षे, व्यवसाय खाजगी नौकरी रा. मटकराळ ता. जि. परभणी ह. मु. खासगी निशा ग्रुप कंपणी नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे कुंटूर** गुरनं 166/2022 कलम 379, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1181 कुमरे, मो.क्र. 8208788324** हे करीत आहेत.

**3)किनवट** :–दिनांक 05.10.2022 रोजी रात्री 08.15 चे सुमारास, **मौ. चिखली बु. आरोपीचे घरी ता. किनवट जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने फिर्यादीचे शेतातील पिंकलर किंमती 13,500/–रूपयाचे चोरून आणुन स्वतःचे घरी आणुन ठेवले. अशा माहिती फिर्यादीस गावतील कमलाकर माधवराव अडकिने यांनी कळविल्याने फिर्यादीने त्यांचेच पिंकलर आहेत असे ओळखले. वगैरे **फिर्यादी प्रभाकर बापुराव हाळे, वय 32 वर्षे, व्यवसाय शेती, रा. गोकुळनगर चिखली बु. ता. किनवट जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे किनवट** गुरनं 195/2022 कलम 379, भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/1326 चौधरी, मो.क्र. 9158134034** हे करीत आहेत.

## 4)मोबाईल चोरी :—

**वजिराबाद** :—दिनांक 30.09.2022 रोजी दुपारी 03.00 ते सायंकाळी 05.30 वा. चे दरम्यान, **तांडाबार समोर नांदेड येथे,** यातील फिर्यादीचा सॅमसंग गॅलक्सी मोबाईल किंमती 50,000/—रूपयाचा कोणीतरी अज्ञात चोरटयांने चोरून नेला. वगैरे **फिर्यादी अजयकुमार तकदिरसिंघ मलीक, वय 39 वर्षे, रा. सेक्टर 44 चंदीगड पंजाब** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरनं 350/2022 कलम 379, भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1824 कदम, मो.क्र. 9921629005** हे करीत आहेत.

## 5)गंभीर दुखापत :—

**1)शिवाजीनगर** :—दिनांक 05.10.2022 रोजी रात्री 09.00 वा. चे सुमारास, **खालसा फायनान्स साठे चौक नांदेड येथे,** यातील नमुद नऊ आरोपीतांनी गैरकायदयाची मंडळी जमवुन यातील फिर्यादी व साक्षीदार यांना तु आमच्या एरियात दुकान चालवतोस, तु आम्हाला पैसे दयावे लागेल असे म्हणुन शिवीगाळ करून थापडबुक्यांनी मारहाण करून मुक्का मार दिला व पाप्या गजभारे यांने फिर्यादीचे डोक्यात दगड मारून डोके फोडुन गंभीर दुखापत करून जिवे मारण्याची धमकी दिली. तसेच रोहीत कुंटे यांना माधव गवाले यांनी नाकावर बुक्की मारून रक्त निघाले आहे. भांडण सोडविण्यास आलेल्या साक्षीदार लोकांना पण लाथाबुक्याने मारहाण करून शिवीगाळ केली. वगैरे **फिर्यादी दिपक खंडु ताटे, वय 42 वर्षे, व्यवसाय खाजगी नौकरी रा. सखोजीनगर नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरन 367/2022 कलम 326, 323, 143, 147, 149, 504, 506 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पाउपनि/श्री रोडे, मो. नं. 9158807759** हे करीत आहेत.

**2)इतवारा** :—दिनांक 05.10.2022 रोजी रात्री 11.00 ते 11.30 वा. चे दरम्यान, **भोईगल्ली हातजोडी दुर्गादेवी समोर नांदेड येथे,** यातील यातील फिर्यादीने आरोपीतांना आम्ही दांडीया खेळतांना तुम्ही आमच्या अंगावर पाणी का उडवत आहात असा जाब विचारल्याने नमुद चार आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीस शिवीगाळ करून तलवारीने तोंडावर मारून ओठ फाडुन व दात पाडुन गंभीर दुखापत केली तसचे लाथाबुक्याने मारून जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी कृष्णा शिवदास हिवरे, वय 21 वर्षे, व्यवसाय मासोळी विक्री रा. सिध्दनाथपुरी भोईगल्ली चौफाळा नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे इतवारा** गुरन 275/2022 कलम 326, 324, 323, 504, 506, 34 भादवि सह कलम 4/25 भाहका कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पोउपनि/श्री एम.बी. राठोड, मो. नं. 9623259955** हे करीत आहेत.

## 4)अपघात :—

**उमरी** :— दिनांक 06.10.2022 रोजी सांयकाळी 06.30 वा. चे सुमारास, **उमरी ते कारेगाव रोडवर वनसगरे, यांचे रोपवाटीका जवळ ता. उमरी जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे साहेबराव केरबा यमलवाड, वय 37 वर्षे, व्यवसाय शेती रा. गोळेगाव ता. उमरी जि. नांदेड** हा त्यांचे स्पलेंडर मो सा क्रं एमएच—26/बीयु—2226 वर बसुन चालवत कारेगाव वरून गोळेगावकडे येत असतांना यातील पांढऱ्या रंगाची स्विफ्ट डिझायर क्रं एमएच—14/जीयु—3563 चे चालकाने हयगयीने व निष्काळजीपणे भरधाव वेगात चालवुन समोरून मो सा ला जोराची धडक देवुन यातील मयताचे मरणास कारणीभुत झाला. वगैरे **फिर्यादी शशिकांत साहेबराव यमलवाड, वय 37 वर्षे, व्यवसाय शेती रा. गाळेगाव ता. उमरी जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे उमरी** गुरनं. 243/2022 कलम 279, ,304(अ), 427 भादवि सह कलम 134/177 मोवाका कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री कऱ्हे , मो.क्र. 7798354377** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड

# <u>प्रेसनोट</u>

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 387 / 2022 दिनांक : 07.10.2022**

नांदेड शहरात " **ईद ए मिलादुन्नबी** "अनुषंगाने वाहतुक मार्गात बदल

नांदेड शहरात दिनांक 09.10.2022 रोजी ईद ए मिलादुन्नबी निमित्ताने मिरवणुक काढण्यात येणार आहे त्या करीता सदर कालावधीत शांतता व सुव्यवस्था राखणेकामी **मा. श्री. प्रमोद शेवाळे**, पोलीस अधिक्षक नांदेड यांना प्राप्त अधिकारानुसार महाराष्ट्र पोलीस अधिनियम 1951 चे कलम 36 अन्वये **दिनांक 09.10.2022 रोजी 08.00 ते 15.00** वा. चे पर्यंत वरील कलमान्वये खालील प्रमाणे वाहतूक मार्गात तात्पुरत्या स्वरूपात बदल करण्यात येत आहेत.

<u>वाहतुकी करीता बंद असलेले मार्ग</u>

1. हबीब टॉकीज, जुना मोंढा, देना बँक, महाविर चौक, तरोडेकर मार्केट, वजिराबाद चौक,कलामंदीर, शिवाजीनगर, आय.टी.आय., श्रीनगर, वर्कशॉप कॉर्नर जाणे व येण्यासाठी पुर्णपणे बंद राहील.
2. वर्कशॉप कॉर्नर, श्रीनगर, आय.टी.आय., चौक शिवाजीनगर, कलामंदीर, वजिराबाद चौकाकडे येणारा रस्ता वाहतुकीसाठी पुर्णपणे बंद राहील.
3. वजिराबाद चौक, शिवाजीपुतळा, महावीर चौक, देना बँक, जुना मोंढा, हबीब टॉकीजकडे जाणे येणरा रस्ता पुर्णपणे बंद राहील.

<u>वाहतुकी करीता पर्यायी मार्ग</u>

1. जुना मोंढा, वजिराबाद ते राज कॉर्नर, कौठा पोलीस चौकी, रविनगर गोवर्धनघाट पुलावरून नांदेड शहरातील येणारी वाहतुक पोलीस मुख्यालय मार्गे खडकपुरा लालवाडी अंडरब्रिज, शिवाजीनगर, पिवळी गिरणी, गेणशनगर वॉय पॉईंटकडे वाहतुक जाण्या येणेसाठी चालु राहील.
2. वजिराबाद चौकाकडुन श्रीनगर वर्कशॉपकडे जाणारी वाहतुक तिरंगा चौक, पोलीस मुख्यालय मार्गे खडकपुरा लालवाडी अंडरब्रिज, शिवाजीनगर, पिवळी गिरणी, गणेशनगर वॉयपॉईंटकडे, जाण्या येण्यासाठी चालु राहील.
3. राजकॉर्नर ते जुना मोंढा मार्गावरील वाहतुक राजकॉर्नर, वर्कशॉप कॉर्नर, भाग्यनगर, आनंदनगर, नाईक चौक, महाराणा प्रताप चौक, बाफना हा मार्ग वाहतुकीसाठी चालु राहील.
4. गांधीपुतळा, शिवाजी महाराज पुतळा येथुन श्रीनगरकडे जाणारी वाहतुक ही चिखलवाडी कॉर्नर, यात्री निवास, हिंगोलीगेट, साठेचौक मार्गे श्रीनगरकडे जाईल.

तरी उपरोक्त प्रमाणे दिनांक 09.10.2022 रोजी चे 08.00 ते 15.00 वा. पावेतो वाहतुकीस अडथळा होऊ नये या करीता पर्यायी मार्गाची अधिसुचना प्रसिध्द करण्यात येत आहे.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड